# जयेश फाउन्डेशन, कळवण

दत्तभूमी मानूर ,ता . कलवण जि . नाशिक ४२३५०१ **(महाराष्ट्र),** दूरध्वनी [०२५९२] २९५८१०, २९५९३१

वेबसाइड : **www.spiskalwan.org,** ९४२३७५६०८६, ९५५२१०२९११, ७५८८६१८९२६, ९४२३९०१९२०, ९४२२७०२१५९


## विद्यार्थ्यांसाठी सूचना

## *जयेश फाउन्डेशन शिष्यवृत्ती परीक्षा २०२४*

सर्व पालक व विदयार्थ्यांना कळविण्यात आनंद होत आहे, की जयेश फाउन्डेशन, कळवण यांच्या विद्यमाने मागील अनेक वर्षांपासून **इयत्ता दहावीतील** गुणवंत, अतिशय हुशार व गरीब विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शरद पवार इंटरनॅशनल स्कूल, मानूर (कळवण) या CBSE अभ्यासक्रम असलेल्या निवासी शाळेत इयत्ता अकरावी व बारावी ( विज्ञान शाखा ) अभ्यासक्रमाचे अध्यापन, तसेच JEE व NEET परीक्षांचे कोचिंग, राहण्याची व जेवणाची सोय तसेच शालेय साहित्य या सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी अशा गुणवंत विदयार्थ्यांना **रविवार दि. ०७ एप्रिल, २०२४ सकाळी ९.०० वाजता शरद पवार इंटरनॅशनल स्कूल, मानूर (कळवण)** येथे शिष्यवृत्ती पात्रतेसाठीची प्रवेशपूर्व ( Entrance Exam ) परीक्षा देणे अनिवार्य आहे. सदर परीक्षा दोन पात्रता फेऱ्यांमध्ये घेण्यात येईल. ही परीक्षा **विज्ञान शाखेत** प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांसाठी इयत्ता दहावीच्या गणित व विज्ञान विषयांवर आधारित असेल.

या दोन्ही पात्रता फेऱ्या विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांसाठी बहुपर्यायी (MCQ) स्वरुपाच्या असतील. प्रथम पात्रता फेरीत १०० प्रश्न ४०० गुणांसाठी असतील, त्यापैकी किमान ५० टक्के गुण प्राप्त केल्यावरच विदयार्थी दुसऱ्या पात्रता फेरीसाठी निवडला जाईल. व्दितीय पात्रता फेरीत विज्ञान शाखेसाठी पात्र ठरणाऱ्या अनुक्रमे पहिल्या पाच विदयार्थ्यांना १०० टक्के तर त्यानंतरच्या पाच विदयार्थ्यांना ५० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल.

शिष्यवृत्ती परीक्षेसंबधीची अधिक माहिती, मागील काही वर्षांच्या सराव प्रश्नपत्रिका व अर्ज आमच्या www.spiskalwan.org या संकेत स्थळावर उपलब्ध असून या संकेतस्थळावरील गुगल लिंकवरुन भरलेला अर्जच स्विकारला जाईल, याची नोंद घ्यावी. अर्ज करण्याची अंतिम मुदत **शुक्रवार दि. ५ एप्रिल, २०२४** पर्यंत असेल. तरी कृपया आपल्या संपर्कातील, विदयालयातील तसेच नात्यातील गरजू व अतिहुशार विदयार्थ्यांना सदर माहिती पाठवावी.

*शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवार न मिळाल्यास शिष्यवृत्ती नाकारण्याचे सर्व अधिकार जयेश फाउन्डेशनकडे राखून ठेवलेले असतील.

**अधिक माहितीसाठी :-**

१. जमशीद पटेल ९४२३७५६०८६

२. तुषार वाघ ९४२३९०१९२०

३. दिपक देवरे ७५८८६१८९२६

४. कृष्णा गवळी ९५५२१०२९११